फौ. कि. चौ. अर्ज क्र.१०९/२०२३

सौ.वर्षा +०२ वि. वसंत

CNR No. MHRG090004652023

<u>अर्ज नि.क्र.०५ खाली आदेश</u>

०१. अर्जदार हिने प्रस्तूतचा अर्ज कौटूंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ ('कौटूंबिक हिंसाचा अधिनियम' संक्षीप्त स्वरूपात) कलम २३ अन्वये उत्तरवादी यांचेकडून तिचेवर कौटूंबिक हिंसाचारास प्रतिबंध व्हावा या अनुशंगाने संरक्षण आदेश, उत्तरवादी याचे ताब्यातील दोन्ही मुलांचा ताबा तीला मिळावा, उत्तरवादी याने तीला कायमस्वरुपी किंवा भाडेतत्तवावर राहण्याची सोय करुन दयावी व तिला आर्थिक अनुतोष म्हणून रक्कम रू.१०,०००/- प्रतिमहिना द्यावी या मागण्या पूर्ण करण्याची विनंती केली.

०२. उत्तरवादी याने प्रस्तूत प्रकरणामध्ये हजर होऊन देखील त्याचे लेखी म्हणणे अभिलेखावर दाखल केले नाही. परिणामी अर्ज नि.क्र.०१ खाली पारित करण्यात आलेल्या दि.१०.१०.२०२३ चे आदेशान्वये त्यांचे लेखी जवाबाची बाजू बंद करण्यात आली.

०३. अर्जदार हिने दाखल केलेला सदरील अर्ज वाचला. अर्जदाराचे विद्वान विधीज्ञ श्रीमती दिव्या सावंत यांनी दाखल केलेला लेखी युक्तिवाद (नि.क्र.१३) चे काळजीपुर्वक वाचन केले. त्याचप्रमाणे अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदाराचे वि.विधीज्ञ यांनी मा.दिल्ली उच्च न्यायालय यांनी दिलेल्या Nikhil Danini vs. Tanya Banon, Criminal Revision Petition No.994/2018 Neha Tyagi Vs. Lieutenant Colonel Deepak Tyagi या न्यायनिर्णयांचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

०४. अर्जदार हिचे कथनाकडे वळण्यापूर्वी कौटूंबिक हिंसाचार अधिनियम मधील

कलम २३ चे अवलोकन करणे न्यायोचीत ठरेल. सदरील कलमाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता उत्तरवादी याने कौटूंबिक हिंसाचाराचे कृत्य केले आहे किंवा ते तो कृत्य करीत आहे किंवा सदरील स्वरूपाचे कृत्य घडणे त्याचेकडून संभाव्य आहे अशी न्यायालयाची अर्जदाराने केलेल्या अर्जावरून सकृतदर्शनी खात्री झाली असता न्यायालय कौटूंबिक हिंसाचार अधिनियम खाली नमूद कलम १८ ते २२ मधील मागण्यांचे अनुशंगाने अंतरीम किंवा एकतर्फी आदेश पारीत करू शकत असल्याचे स्पष्ट होते.

०५. अर्जदार हिने प्रस्तूतचा अर्ज शपथेवर दाखल केला. अर्जातील कथन उत्तरवादी याने अर्जदार हिला शारिरीक व मानसिक प्रकारचा त्रास देवून तिचेवर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दर्शवितो. अर्जदार हिचे कथन उतरवादी तिचे चारित्र्यावर संशय घेवून तिला शिवीगाळ व मारहाण करतो, तो तीला जीवाने ठार मारण्याची धमकी देतो, तो तीला दारु पिण्याकरीता पैश्याची मागणी करतो, तो दोन्ही मुलांना घेवून ट्रेन खाली जीव देईन अशी तीला धमकी देतो, या बाबी स्पष्टपणे दर्शविते. परिणामी, तिने प्रस्तूतचे अर्जाद्वारे परि.क्र.०१ मधील नमूद मागण्या उतरवादी याला पूर्ण करण्याचे अनुशंगाने आदेश देण्याची विनंती केली.

०६. अर्जदाराने तिचे कथन शपथेवर अभिलेखावर दाखल केले. उल्लेखनीय बाब म्हणजे संरक्षण अधिकारी यांनी कौटूंबिक हिंसाचार घटनांचे अनुशंगाने अहवाल दाखल केल्याचे दिसून पडते. सदरील अहवालाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता उतरवादी याने वर नमूद प्रकारे अर्जदाराला त्रास दिल्याची बाब स्पष्टपणे दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदाराने तिचे कथनाचे पुष्ट्यर्थ उत्तरवादी याचेविरूद्ध तिने दि.२८.०५.२०२३ रोजी पोलीस स्टेशन, रोहा येथे दिलेल्या तक्रारीवरून नोंदविण्यात आलेल्या अदखलपात्र गुन्ह्याचे अनुशंगाने तक्रारीची नक्कल प्रत व त्या अनुषंगाने उत्तरवादी याने चांगले वागण्याचे अनुषंगाने करुन दिलेले हमीपत्र, हे दस्त अभिलेखावर दाखल केले आहेत.

०७. उल्लेखनीय म्हणजे उतरवादी याने प्रकरणात हजर होऊन देखील अर्जदाराचे

कथन नाकारले नाही. नमूद परिस्थितीमध्ये ते त्याला मान्य असल्याचे दिसून पडते.

०८. सामान्य परिस्थितीमध्ये कुठलिही भारतीय स्त्री तिचे सासरचे व्यक्तींकडून तिला चांगल्या प्रकारची वागणूक मिळत असल्यास त्यांचेविरूद्ध खोटे दोषारोप करण्याचा पर्याय निवडणार नाही. त्याचप्रमाणे कुठलिही स्त्री तिचे चारित्र्यावर संशय घेतल्यास तिला अपमानजनक वाटेल. नमूद परिस्थितीमध्ये अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे दिसून पडते.

०९. उतरवादी याने अर्जदार हिचे चारित्र्यावर वैधकारणाशिवाय संशय घेणे, तिला शारिरीक मारहाण व शिवीगाळ करणे, तिला जिवे मारणाची धमकी देणे, त्यांचे मुलांना घेवून ट्रेनखाली जीव देण्याची धमकी देणे, अर्जदाराचे व मुलांचे आर्थिक गरजांकडे दुर्लक्ष करणे, या बाबी कौटूंबीक हिंसाचार अधिनियमाच्या कलम ०३ मधील 'शारिरीक दुर्व्यवहार', 'शाब्दीक, आर्थिक आणि भावनीक दुर्व्यवहार' या संकल्पनांमध्ये मोडतात.

१०. अर्जदार हिचे कथनाप्रमाणे उत्तरवादी हा धाटाव एम.आय.डी.सी मधील सुदर्शन प्रायव्हेट लिमीटेड कंपनीमध्ये नोकरी करित असून त्याला प्रतिमहिना रू.१५,०००/– उत्पन्न मिळते. परंतू, नमूद उत्पन्नाचे अनुशंगाने अर्जदार हिने कोणताही लेखी पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. परंतू, नमूद परिस्थितीमध्ये अर्जदार हिचे शपथेवरील कथन पुर्णपणे नाकारता येणार नाही. अर्जदाराचे कथन व पुरावा सद्या ती तीचे वडीलांकडे राहत असून तीने उत्तरवादी याचे ताब्यातील दोन्ही मुलांचा ताबा मिळण्याची विनंती केल्याचे दिसून येते.

११. कौटूंबीक हिंसाचार अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे उत्तरवादी याची अर्जदार व त्यांचे दोन्ही मुलांना सांभाळण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे अर्जदार व उत्तरवादी यांचेमधील कौटूंबिक नातेसंबंधांचे अनुशंगाने उत्तरवादी याने कुठलाही विरोध केल्याचे दिसून येत नाही. नमूद परिस्थितीमध्ये अर्जदार व उत्तरवादी यांचे राहणीमानाचा दर्जा, उत्तरवादी याला मिळणारे उत्पन्न, त्याचेवर असलेल्या जबाबदाऱ्याचे अनुशंगाने पुराव्याचा अभाव, अर्जदार

हिची मुलांचा ताबा मिळण्याची मागणी, त्या मुलांचे वय, या बाबी विचारात घेता माझे मते अर्जदारारीता प्रति महिना रू.६,०००/– रक्कम आर्थिक अनुतोष म्हणून उत्तरवादी याला देण्यास आदेशीत करणे व उत्तरवादी याचे ताब्यातील दोन्ही मुलांचा ताबा अर्जदार हिला देण्याचे आदेशीत करणे न्यायोचीत ठरेल. त्याचप्रमाणे अभिलेखावरील पुरावा विचारात घेता अर्जदारास उत्तरवादीविरूद्ध संरक्षण आदेश देणे या अनुशंगाने आदेश पारीत करणे देखील गरजेचे असल्याचे दिसून पडते. अर्जदार ही सद्या तीचे आई वडीलांकडे राहत असल्यामुळे प्रकरणाची अंतरीम स्थिती विचारात घेता तीने उत्तरवादी याचे कडून कायमस्वरुपी किंवा भाडेतत्वावर निवासाची व्यवस्था करुन देण्याची मागणी नामंजूर करणे न्यायोचित ठरेल. वरील विवेचनाअंती मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

०१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. उत्तरवादी याने अर्जदारास कौटूंबीक हिंसाचार अधिनियम कलम २० प्रमाणे रू.६,०००/–(रुपये सहा हजार मात्र) प्रति महिना प्रस्तूत अर्ज दाखल केला तेव्हा पासून म्हणजेच दि.२७/०६/२०२३ पासून प्रस्तूत प्रकरणाचा न्यायनिर्णय होईपर्यंत द्रव्याच्या स्वरुपात अनुतोष द्यावा.

०३. उत्तरवादी याने अर्जदारावर कोणत्याही प्रकारचा कौटूंबीक हिंसाचार करू नये.

०४. उत्तरवादी याने त्याची मुले नामे कु. आराध्य वसंत मामलुसकर व कु. तीर्था वसंत मामलुसकर यांचा ताबा ताबडतोब अर्जदारास दयावा. उत्तरवादी याला त्याचे दोन्ही मुलांना भेटण्याची मुभा राहिल. न्यायालय जेव्हा आदेश देईल तेव्हा अर्जदाराने दोन्ही मुलांना उत्तरवादी यास भेटण्याकरीता न्यायालयामध्ये हजर ठेवावे.

०५. अर्जदाराने निवासाचे अनुषंगाने केलेली मागणी नाकारण्यात येते.

०६. आदेशाची प्रत अर्जदार व उत्तरवादी यांना मोफत देण्यात यावी.

०७. आदेशाची प्रत पोलीस स्टेशन, रोहा व संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. त्यांनी प्रस्तूत आदेशाचे अंमलबजावणीमध्ये अर्जदारास मदत करावी.

स्वाक्षरी/-

स्थळ : रोहा.
(एस. एस. महाले)

दिनांकः २८.११.२०२३
न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा

(टिप – डिजीटल स्वाक्षरीची मुदत संपल्यामुळे प्रस्तूतचा दस्त डिजीटल स्वाक्षरीने सही केलेला नाही.)

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | :- | S.G.Padwal, Grade -III. |
| Name of the Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- | 28/11/2023. |
| Judgment / Order delivered on | :- | 28/11/2023. |
| Judgment / Order signed on | :- | 28/11/2023. |
| Judgment / Order uploaded on | :- | 30/11/2023. |